छत्रपती संभाजी महाराज जयंती आणि सायं अपडेट वर्धापन दिन विशेष

दैनिक
DAINIK
SAYAN UPDATE
# सायं अपडेट

■ वर्ष ४ थे ■ अंक १३ ■ बुधवार १४ मे २०२५ ■ मराठी ■ सायं दैनिक ■ सोलापूर ■ पाने : २८ ■ किंमत ३ रुपये

■Vol 4 ■ Issue no 13 ■ Wednesday 14 May 2025 ■ Marathi ■ Evening Daily ■ Solapur ■ Page : 28 ■ Price : Rs. 3/-

sayanupdate@gmail.com 8055620155 RNI NO. : MAHMAR/2022/82698

# छत्रपती संभाजी महाराज



## तरुणांनी आदर्श घ्यावा असा छावा

किती जगावे यापेक्षा कसे जगावे याचा ऐतिहासिक धडा अजरामर करून जाणारे छत्रपती म्हणजेच संभाजीराजे होय. अत्यंत कमी आयुष्य लाभले असतानाही या कमी कालावधीत अत्यंत ऐतिहासिक कामगिरी त्यांनी करून आजच्या तरुणांपुढे एक आदर्श घालून दिला आहे. जन्मतः आईचे दूधही न लाभलेला मुलगा पुढे जाऊन स्वराज्याचे रक्षण करतो आणि तत्कालीन औरंगजेबसारख्या मोठा फौजफाटा असणाऱ्या विरोधकाला नडतो, ही मोठी ऐतिहासिक बाब आहे. छत्रपती संभाजीराजांनी आपल्या या अल्पायुषी जीवनात अनेक लढाया जिंकल्या, किल्ले काबीज केले त्याचबरोबर आपल्या चाणाक्ष बुध्दीच्या जोरावर अनेक ग्रंथांची निर्मितीही केली. प्रजाहिताचे अनेक निर्णय घेतले. त्यामुळेच संभाजीराजे हे दुसरे छत्रपती म्हणून सर्वांना आपलेसे वाटू लागले. अशा या छावाचा आदर्श आजच्या तरुणांनी घेणे गरजेचे आहे.

छत्रपती संभाजी महाराज दोन वर्षांचे असताना त्यांच्या आई सईबाईंचा मृत्यू झाला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी शंभू बाळाला आईची कमतरता भासू नये यासाठी धाराऊ नावाच्या दुधाऊ त्यांच्यासाठी ठेवल्या. शंभू राज्यांचे बालपण खूप अडचणीत गेले. वयाच्या दुसऱ्या वर्षी स्वतःची आई त्यांना सोडून देवा घरी गेली. लहानपणी बाळ शंभू राज्यांना आऊसाहेब राजमाता जिजाबाई महाभारत आणि रामायणाच्या कथा सांगायच्या.

आपल्या छोट्याशा जीवनामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांनी खूप युद्धे जिंकली. त्यांनी युद्धात औरंगजेबाला कधीही जिंकू दिले नाही. छत्रपती संभाजी महाराजांना फक्त बाहेरील शत्रूंचा सामना करायचा नव्हता तर त्यांना स्वराज्यातील काही आपल्या शत्रूंचा देखील सामना करायचा होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत फक्त सुरत लुटली; परंतु छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबाचे घर समजले जाणारे बुऱ्हाणपूर लुटले. बुऱ्हाणपूर लुटल्याचा तोटा औरंगजेबाला खूप झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात औरंगजेबाच्या अत्याचाराला घाबरून खूप हिंदू लोकांनी धर्म परिवर्तन केले होते. त्यातील काहींना छत्रपती शिवाजी महाराजांनी परत हिंदू धर्मात घेतले. असेच छत्रपती संभाजी राजांचे गुरू असणारे नेताजी पालकर यांचे औरंगजेबाने धर्म परिवर्तन केले होते. नेताजी पालकर खूप वर्षातून स्वराज्यात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे धर्म परिवर्तन केले.

**साहित्यिकांना ९० हजार पेन्शन देणारे दातृत्व**

संभाजीराजे यांचे साहित्यावर अत्यंत प्रेम होते. त्यामुळेच त्यांनी १४ वर्षाच्या लहान वयातच अनेक ग्रंथांची निर्मिती केली. स्वतः साहित्य प्रेमी तर होतेच शिवाय त्यांना साहित्यिकांची कळव होती. म्हणूनच आजच्या काळात नव्वद हजार रुपये होतील इतके मानधन देण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी त्या काळात घेतला होता. यावरून त्यांचे साहित्यप्रेम अधोरेखित होते.

## ।। मानाचा मुजरा।।

प्रजावत्सल धर्माभिमानी, सुसंस्कृत,
मातृभूमी मुक्तक, ऐसे एकचि संभाजी महाराज।।

खुद्द काळ गातोय तयांचे शिवशौर्य आज।।

सातसतक, नायिकाभेद, बुधभूषण, नखशिखा ग्रंथाचे रचयिता
दिधला तुम्ही अवघ्या मानवा जीवन विचार।।

शोभतसे एका हाती लेखणी, हाती एका तलवार।।

इंग्रज, पोर्तुगीज, औरंगजेब, मोगलांना केले या शिवपुत्रांने बेजार।।

साहित्यिक, भाषातज्ज्ञ, कलाप्रेमी, कवी, व्यवहारकुशल, शेतीतज्ज्ञ,
उत्तम प्रशासक, महापराक्रमी, महाबुध्दीमान, महाशूर ऐसे अष्टपैलू,
तेज पुंज शुरत्वाचे व्यक्तिमत्त्व धारदार।।

घ्यावा जी कृपावंत महाराज हा मानाचा मुजरा विनवीतसे कवी
देवेंद्र वारंवार।।

**कवीवर्य - देवेंद्र औटी**

## एकही लढाई न हरणारे योध्दे

समोर लाखोंची फौज असणारा आणि शस्त्र संपन्न औरंगजेबसारखा बलाढ्य विरोधक असताना आपल्या संपूर्ण कारकिर्दीत एकही लढाई न हरलेले छत्रपती म्हणून संभाजी राजांचा गौरव करावा लागेल. किती जगावे पेक्षा कसे जगावे याचा वस्तूपाठच त्यांनी घालून दिला आहे. छत्रपती संभाजी महाराजांना जवळपास ३२ वर्षांचे आयुर्मान लाभले इतक्या कमी कालावधीत त्यांनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली अनेक किल्ले गड ताब्यात घेतले औरंगजेब सारख्या शत्रूला झुलवत ठेवले आणि स्वराज्य ताब्यात ठेवला होता.




हे सायं दैनिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रक **औदुंबर अशोक खेलबुडे** यांनी **व्यंकटेश प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन** मार्डी ता.उत्तर सोलापूर. जिल्हा सोलापूर महाराष्ट्र येथे छापून प्रकाशित केले.
❍ **संपादक- औदुंबर अशोक खेलबुडे. मोबाईल नं.८०५५६२०१५५**

**OWNED, PRINTED AND PUBLISHED BY** AUDUMBAR ASHOK KHELBUDE A/P MARDI,TAI-NORTH SOLAPUR, DIS- SOLAPUR.413002 [MAH].
**PRINTED AT** VYANKATESH PRINTERS AND PUBLICATION. A/P- MARDI TAL-NORTH SOLAPUR DIS- SOLAPUR413002 MAH .
**PUBLISHED AT** A/P- MARDI TAL-NORTH SOLAPUR DIS- SOLAPUR413002 MAH .
❍ **EDITOR- AUDUMBAR ASHOK KHELBUDE CELL- 8055620155**
❍ **E-Mall : sayanupdate@gmail.com TITL E-CODE.-MAHMAR- 51831**


दैनिक सायं अपडेट
तसेच
अपडेट NEWS
(न्यूज चॅनल)
३ रा वर्धापन दिन
शुभारंभास हार्दिक शुभेच्छा !
आ. सचिनदादा कल्याणशेट्टी
मिलन कल्याणशेट्टी
माजी नगरसेवक
Jaideep Anjutagi
Civil Engineer & Govt. Contractor
Mahesh Shedam
Govt. Contractor
HIRASKAR-9922924638

# शिवपुत्र संभाजी महाराज

समुद्र कितीही अथांग असला तरी आभाळ त्याला व्यापून ऊरते, वादळे कितीही मोठी झाली तरी कल्पवृक्ष त्याला व्यापून उरतो. ही व्याप्ती ही शक्ती ज्या व्यक्तीजवळ असते ते व्यक्तिमत्त्व नेहमीच अजिंक्य ठरते!

छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यात प्रचंड मोठा संघर्ष उभा ठाकला होता. केवळ ३२ वर्षांच्या आयुष्यात शंभुराजांनी औरंगजेबासारखा ताकदवर शत्रूला पळता भुई अन् सळो की पळो करून सोडले ते महाराजांच्या अंगी असलेल्या लढाऊ बाण्यामुळे.

१४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावरती बाळ शंभूराजेंचा जन्म झाला. बाळराजे जन्मले म्हणून सगळीकडे आनंदी आनंद साजरा झाला. पण या बाळाच्या कपाळावर हा आनंद जास्त टिकू दिला नाही. आई सईबाई यांना बाळंत रोग झाल्याने बाळाला पाजायला दूध मिळू शकत नव्हते. याचाच अर्थ आईच्या दुधापासून सुरू झालेला हा संघर्ष मृत्यूपर्यंत पाठलाग करत राहिला. जिजाऊ माँ साहेबांची आजीच्या मायेने धाराऊ गाडे या बाळ शंभुराजांच्या दूध आई झाल्या. नियतीने दूध हिसकावून घेतलेच होते पण काही काळाने आई देखील मरण पावली. आईविना हे बाळ आजीच्या संस्कार छायेखाली मोठे होत होते. संस्काराची शिदोरी घेऊन आजी बाळ शंभूराजांना घडवत होत्या. पिता शिवाजी राजे हे पाहून निश्चिंत झाले की, स्वराज्याचे भविष्य जिजाऊ नावाच्या विद्यापीठात घडत आहे.

बाळ शंभुराजांना शिवरायांसारखा अलौकिक पिता, आजी जिजाऊ माँ साहेब यांचे मातृतुल्य प्रेम लाभले. लहानपणीच शंभूराजांनी रामायण, महाभारत, शास्त्रे, पुराणे, संस्कृत, संगीत, धनुर्विद्या या विषयांचा सखोल अभ्यास केला. कुमार वयातच संभाजीराजांनी बुधभूषण, नखशिखात, सातसतक आणि नायिकाभेद हे चार ग्रंथ लिहिले. वयाच्या १४ व्या वर्षी चार ग्रंथ लिहिणारे संभाजी महाराज प्रतिभावंत लेखक होते.



आज छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास बऱ्यापैकी प्रकाशझोतात आला आहे. यामध्ये वासी बेंद्रेंपासून कमल गोखले सोबतच अनेक इतिहास संशोधकांचे योगदान महत्त्वाचे आहे. छावा चित्रपट बघून आपले रक्त सळसळते पण खोलवर जाऊन आपण संभाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास केल्यास आपल्याला जगण्यासाठी, लढण्यासाठी प्रचंड प्रेरणा मिळेल. कारण जगाच्या इतिहासात संभाजी महाराजांच्या पराक्रमाला, बुध्दिदमत्तेला आणि बलिदानाला तोड नाही.

'आबासाहेबांचे जे-जे संकल्पित तेच आम्हा करणे अगत्य' याच तवावर आपले आयुष्य कुर्बान करणारे, कराल काळाला आपली मुंडी बहाल करणारा पण जिवंत असेपर्यंत स्वराज्यातील एकही किल्ला औरंग्याला मिळू न देणारे शिवपुत्र संभाजी महाराज हे आजच्या तरुणांना संकट काळात लढायला बळ आणि ऊर्जा देत राहतील.

संभाजी महाराज जिवंत असेपर्यंत मराठा राज्य देखील जिवंत होते, हीच संभाजी महाराजांची खरी कर्तबगारी होती. फ्रेंच प्रवासी अबे करे महाराजांबद्दल असे म्हणतो की, पित्याच्या कीर्तीस साजेल असा शूर वीर पुत्र आहे. अशा प्रकारे संभाजी महाराज हे आपल्या वडिलांचे स्वप्न साकार करणारे कर्तव्यतत्पर पुत्र ठरतात.

आजच्या तरुणाईसमोर जेव्हा जेव्हा जीवघेणी संकटे उभी राहतील तेव्हा त्यांनी मरणाला मिठीत घेऊन हुतात्मे पत्करणारे संभाजी महाराज यांचे स्मरण करावे. त्यांना नक्कीच लढायला बळ मिळेल. संभाजी महाराज औरंग्यासमोर झुकले वाकले असते तर जिवंत राहिले असते. पण महाराष्ट्र धर्म नाहीसा झाला असता, स्वाभिमानी बाणा संपला असता. म्हणूनच आपण देखील आज महाराजांच्या इतिहासावर नुसते वाद उकरून काढण्यापेक्षा त्यांचे विचार आत्मसात करतो का याचा विचार करून वाटचाल करायला हवी!

**छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित त्यांना मानाचा मुजरा!**

**खंडू डोईफोडे**
शिव शंभू व्याख्याते बार्शी
८९९९१०१५५४



# स्वराज्याचे दुसरे छत्रपती स्वराज्यरक्षक श्रीमंत श्री संभाजी महाराज

चाळीस दिवस अत्याचार सहन करून जो कधी झुकला नाही. गोरगरीब जनतेसाठी इमान कधी विकले नाही. केल्या अनेक लढाया, मात्र माघार कधी घेतली नाही. चहूबाजूंनी यवनांशी एकटा लढत होता. त्यांच्या नावाने दुश्मन झोपेतही घाबरत होता. अशा पराक्रमी राजाचा इतिहास आमच्या पोरांना कळू दे, महाराष्ट्राच्या, भारतभूमीच्या प्रत्येक घरातून राजा छत्रपती संभाजी उदयास येऊ दे.

महाराज शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज आणि इतर असंख्य मावळ्यांनी स्वराज्यसाधनेचा जो यज्ञ मांडला होता, त्यातून स्वधर्म, स्वजाती, स्वभाषा यांचे रक्षण करण्यात आले. या स्वराज्ययज्ञात ज्या अनेक ज्ञात-अज्ञात वीरांनी प्राणांची आहुती दिली, त्या वीरांमध्ये संभाजी महाराजांचे स्थान अढळ ध्रुवताऱ्याप्रमाणे आहे. मराठ्यांच्या इतिहासात सर्वात जास्त चर्चेचा विषय संभाजी महाराजांची कारकिर्द हा आहे. शिवछत्रपती महाराजांनी मुघलशाही, आदिलशाही, सिध्दी, पोर्तुगीज, इंग्रज इत्यादी सत्तांबरोबर अविरत संघर्ष करून स्वराज्य स्थापना केली व स्वधर्म जागविला. छत्रपती संभाजी महाराजांनी शिवछत्रपतींच्या कार्याचा आदर्श घेत त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून राज्य कारभार केला. शिवछत्रपतींनी निर्मिलेले स्वराज्य टिकविणे आणि त्याचा विकास-विस्तार करणे अशी दुहेरी जबाबदारी छत्रपती संभाजी महाराजांच्या खांद्यावर होती. ही जबाबदारी पेलण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केल्याचे इतिहासात दिसून येते.

संभाजी महाराजांचे आयुष्य उणेपुरे ३२ वर्षांचे. त्यांची एकूण राजकीय कारकिर्द १९ वर्षांची आहे. या कारकिर्दीचे एकूण तीन भागात वर्णन करता येईल. सन १६७१ ते १६७४ हा पहिला खंड. सन १६७४ ते १६८० हा दुसरा तर १६८० ते १६८९ हा तिसरा कालखंड समजता येईल. संभाजी महाराजांची राजकीय कारकिर्द म्हणजे राज्यसत्ता, वतनी कारभार आणि ज्ञातिसत्ता किंवा धर्मसत्ता अशा तीन गोष्टींचे प्रभावी एकत्रिकरण होय. शिवरायांसोबत त्यांची तुलना करणे अयोग्य होईल. मात्र, तरीही त्यांची राजकीय तसेच संपूर्ण कारकिर्द ही श्रेष्ठ व सरसच मानली गेलेली आहे. पराभव, माघार, तह इत्यादी गोष्टी त्यांच्या वाट्याला आल्या नाहीतच.

छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा इतिहासात काही लोकांनी दुराचारी, दुर्व्यसनी म्हणून आकसाने केली असली तरी ती पूर्णपणे काल्पनिक व अवास्तव आहे. याउलट संभाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीचा, कदाचित आयुष्याचाही क्षण नि क्षण स्वराज्याच्या कार्यासाठीच वेचला असल्याचे पुराव्यानिशी सिध्द आहे. राजभोग तर सोडाच पण सामान्य गृहसुखाचा लाभ त्यांना घेता आला नाही. मोगलाई परचक्राला तोंड देण्यासाठी कर्तव्यनिष्ठा, स्वराज्यनिष्ठा जागृत ठेवून त्यांना सतत झगडावे लागले.

आपल्या भीषण मृत्यूप्रसंगी दाखवलेला प्रचंड संयम, धाडस आणि सहनशीलता याबरोबर प्रचंड स्वाभिमान त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाची प्रकर्षाने जाणीव करून देतात. दुराग्रही, दुराचारी व दुर्व्यसनी माणसाकडून मृत्यूला असे सामोरे जाण्याचे धाडसच नसते. ही गोष्ट इथे नमूद करावीशी वाटते. यावरूनच छत्रपती शंभुराजे निष्कलंक चारित्र्याचे, पराक्रमी, शूर, धाडसी तितकेच स्वराज्यनिष्ठ होते हे मान्यच करावे लागेल. अशा या तेजस्वी छत्रपती संभाजी महाराजांची आणि त्यांची सखी तथा राज्ञी येसूबाईसाहेब यांची कारकिर्द अत्यंत महत्त्वपूर्ण प्रसंग आणि हालचालींनी भरलेली आहे. यामधून एकट्या संभाजीराजांनी अखिल हिंदुस्थानातील शक्तीसामर्थ्यांसोबत हिंदवी स्वराज्यासाठी सुसंघटितपणे दीर्घकाल दिलेल्या प्रतिकाराचा विचार केल्यास महाराष्ट्राची खरी कर्तबगारी, उज्ज्वल संस्कृती व तेजस्वी राष्ट्रभावना या साऱ्या कसोटींचा परिपाक छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानात दिसून येतो.

जगाच्या इतिहासात सर्वात कठोर मरण ज्यांच्या वाट्याला आले अशांमध्ये केवळ शंभूराजेच प्रकर्षाने आठवतात. त्यांनी भोगलेल्या हालअपेष्टा व अत्याचार हा त्यांच्या जीवनाचा खडतर प्रवास दाखवतात. १४ मे १६५७ रोजी पुरंदरच्या कुशीत जन्मलेला छावा मातृसुखाला पारखा झाला तेव्हा अवघा दोन-सव्वादोन वर्षांचा तर होता. बालपण जगायचे तर अफजलखानाचे सावट



स्वराज्यावर होते. वयाच्या आठव्या-नवव्या वर्षी पुरंदरच्या तहात मिर्झाराजेंच्या छावणीत ओलीस राहणारे शंभूबाळ आग्र्यास गेल्यावर औरंगजेबाच्या समोर निधड्या छातीने वावरणारे शूर बालक होते. किंबहुना राजनीतीचे बारकावे तिथेच शिकणारे शंभुराजे धाडसी म्हणावेच लागतील. अखंड हिंदुस्तानात आलमगिराच्या दरबारात स्वाभिमानाने गरजणारे शिवछत्रपती त्यांनी बालवयातच पाहिले होते. त्यामुळे तो करारीबाणा आपसूकच त्यांना बाळकडू म्हणून मिळाला होता. अशा स्वाभिमानी पित्याच्या पोटी जन्म घेऊन बदफैली थोडेच होता येईल?

इतिहासातल्या अत्यंत दुर्दैवी व्यक्तिमत्त्वांपैकी छत्रपती संभाजीराजे हे एकमेव असतील. ज्या वयात आईचे बोट धरावे त्याच वयात आईचा मृत्यू, ज्या वयात पित्याच्या अंगाखांद्यावर खेळावे, त्यावेळी पिता स्वराज्याच्या कामी मोहिमेवर, ज्या आऊसाहेबांच्या कुशीत वाढले, त्या आऊसाहेबही त्यांना लवकरच सोडून गेल्या. शिवरायांच्या निधनावेळी शंभूराजेंची व शिवरायांची भेटही होऊ न देणारी कारभारी मंडळी, शिवरायांचे निधन झाले म्हणून स्वराज्य गीळंकृत करायला येणाऱ्या आलमगीर बादशहाला तोंड देताना स्वकीय लोकांशी करावा लागलेला संघर्ष आणि त्यातून फंदफितुरीने आलमगीर बादशहाच्या सैन्याच्या तावडीत सापडून हाल-हाल सोसून भीषण मरण पत्करणारे शंभुराजे. असे जीवन आणि असे मरण इतिहासात फक्त आणि फक्त शंभूराजांच्याच वाट्याला आलेले आहे. म्हणूनच ते छात्रवीर धर्मवीर व स्वराज्यरक्षक म्हणून इतिहासात अजरामर आहेत.

केवळ ४० दिवसांच्या यातना सोसून मरण पत्करले हाच त्यांचा इतिहास नसून राजधर्म, प्रजाहित व स्वराज्य रक्षण करणारे शंभूराजे हे खऱ्या अर्थाने धीरोदत्त राजा म्हणावे लागतील. केवळ राज्याभिषेक करून स्वतःला राजा किंवा छत्रपती म्हणून घेणारे शंभूराजे नव्हते. राजाचा राजधर्म असतो तो प्रजेचे रक्षण करणे, प्रजेला सुखी ठेवणे. तिला उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरित करणे. राज्य, धर्म संस्कृती, स्वभाषा या गोष्टींचे रक्षण करणे. न्यायदान हा राज्याचा महत्वपूर्ण भाग असतो. कोणावरही अन्याय होऊ न देणे या राजधर्माचे शंभूराजांनी काटेकोरपणे पालन केले. एकतंत्री कारभार त्यांनी कधी केला नाही. संभाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळातील आणि स्वराज्यातील अधिकारी यांच्यावर चांगला विश्वास दाखवून सत्तेचे योग्य विकेंद्रीकरण केलेले होते. कारभाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात विनाकारण हस्तक्षेप ते कधीच करत नसत. शेती व्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणताना पडीक जमीन लागवडीखाली कशी आणता येईल, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. प्रसंगी महसुलात आवश्यक ती सूट दिलेली आढळते. महसूल वाढवण्याकडे त्यांनी काटेकोरपणे लक्ष दिले. सरकारातून उदरनिर्वाहासाठी शेती, अवजारे, बियाणे व बैलजोडी दिलेली आढळते. सन १६८५-८७ या कालावधीत पडलेल्या प्रचंड दुष्काळाला त्यांनी यशस्वीपणे तोंड दिले. व्यापार-उद्योगांना प्रोत्साहन दिले. बाजारपेठा बसवून स्वराज्यात व्यापाऱ्यांना निमंत्रित केले. शत्रूच्या हल्ल्याने गाव सोडून गेलेल्या प्रजेला पुन्हा गावे बसवण्यासाठी बक्षीसनामे दिले.

प्रशासनात गतिमानता हे शंभूराजांच्या प्रशासनाचे वैशिष्ट्य होते. वतनदारी मोडीत काढून सर्वांना पगारी मोबदला देण्यास सुरुवात केली. सरकारचे उत्पन्न वाढवण्यावर त्यांनी भर दिला होता. पोर्तुगीज, इंग्रज यांच्याबरोबर कठोर निर्णय घेऊन परराष्ट्र धोरण त्यांनी अवलंबलेले होते. व्यापाराच्या नावाखाली या सत्तांना स्थानिक राजकारणात हस्तक्षेप करू दिला नाही. विशेष म्हणजे या सुधारणा त्यांनी १६८१ ते १६८९ या अत्यंत धामधुमीच्या कालावधीत केलेल्या आढळतात.

अशाप्रकारे प्रखर स्वाभिमान, अलौकिक बुध्दिचातुर्य, उच्च निर्णयक्षमता आणि अचाट धाडसाच्या जोरावर शंभूराजांनी आपली कारकिर्द अत्यंत तेजस्वी व अभिमानास्पद बनवलेली आहे. संस्कृत, इंग्रजीसह आठ भाषांवर प्रभुत्व असणारे साहित्य, संस्कृती, शस्त्र आणि शास्त्राचा उत्तम अभ्यास असणारे आणि तितकेच सुसंस्कृत असणारे छत्रपती संभाजी महाराज आपल्या पित्याच्या कर्तृत्वाला ग्रहण लावणारे नव्हते, तर पित्याच्या पराक्रमाची उंची वाढवणारे आदर्श असे पुत्र होते. अशा या महान पराक्रमी शूर छाव्यास जन्मदिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम.

**जय जिजाऊ.**
**जय शिवराय.**
**जय शंभुराजे.**
**जय हिंद.**



**तुकाराम जाधव**
सोलापूर
९४२३३३०७९२

नोंदणी क्र.: एम.एस.सी.एस./सी.आर./२७३/२००८/दि.२८-०४-२००८



Quality Care with a Human Touch

# अश्विनी

## सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियं., सोलापूर

मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी

उच्च गुणवत्ता, अद्यावत तंत्रज्ञान व सर्वोत्तम सेवेसाठी मानाची दोन मानांकने प्राप्त

NABH Accredited

## NABH व NABL

प्रमाणित

सोलापूर व परिसरातील एकमेव

मल्टी डिसीप्लिनरी टर्शिअरी केअर हॉस्पिटल

NABL ISO / IEC 17025 Accredited









- संपूर्ण सुसज्ज ७ मोड्युलर ऑपरेशन थिएटर (AHU & HEPA) फिल्टरसह
- स्टेट ऑफ दी आर्ट २ कॅथलॅब्ज्
- CVTS ऑपरेशन थिएटर व स्वतंत्र रिकव्हरी युनिट
- सुसज्ज डायलिसीस व युरोलॉजी युनिट
- दुर्बिणीद्वारे, संगणकीकृत कृत्रिम सांधेरोपण
- स्वतंत्र गॅस्ट्रोएन्टोलॉजी व किडनी ट्रान्सप्लांट युनिट
- सर्व सरकारी विभाग व आरोग्य विमा कंपनीशी संलग्नित
- संलग्नित सरकारी व निम सरकारी संस्थांच्या लाभार्थ्यांना कॅशलेस सुविधा
- DNB Medicine & DNB DA कोर्सकरीता मान्यताप्राप्त

अद्यावत उपचार पध्दतीने सुसज्ज

## न्युरो रिहॅबिलीटेशन सेंटर

गंगाधर कुचन
प्रेसिडेंट

बिपीनभाई पटेल
चेअरमन

समस्त संचालक मंडळ

24 / 7 ॲम्ब्युलन्स सेवा




सर्व्हे नं. 7107/1, टँक प्लॉट नं.180, उत्तर सदर बझार,
सोलापूर 413003. फोन: 0217-2319900-06
ई-मेल : ashwinihosp@yahoo.com
ashwinihosp.solapur@gmail.com
वेबसाईट : www.ashwinihospital.co.in

follow us on Ashwini Sahakari Rugnalaya Ani Sanshodhan Kendra Nyt Solapur    Ashwini Sahakari Rugnalaya official



# शंभूराजा



भारतीय इतिहासातील एक अद्वितीय बुध्दिमत्तेसह विविध गुणवैशिष्ट्ये असलेला राजा. आजच्या पिढीच्या ही पुढे असलेला राजपुत्र. या योध्द्यांनी ढाल तलवारी तर गाजवल्याच पण साहित्य क्षेत्रातही फार मोठी निर्मिती केली आहे. अवघ तीन दशके आयुष्य लाभलेल्या या राजाने रणमैदानात झुंजले तसे साहित्यिक म्हणून मैदान मारले आहेत.

वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी बुधभूषण हा संस्कृत ग्रंथ लिहायला सुरुवात केली. याचबरोबर सात सतक, नखशिखा, नायिकाभेद या ब्रीज/हिंदी भाषेतील ग्रंथ लिहिले. शंभूराजेंना स्थानिक भाषेबरोबरच परकीय भाषांपैकी इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच, पोर्तुगीज, डच, हिब्रू, फारशी, उर्दू या भाषाही लिहिता, बोलता, वाचता येत होत्या.

बुधभूषण या काव्यात्मक संस्कृत ग्रंथातील पहिल्या अध्यायात शंभूराजांनी आपल्या शिवकुळाचा सांस्कृतिक वारसा सांगितला आहे. स्वकुळ भोसले कुळाची ही महान परंपरा मांडली आहे. सिंधू संस्कृतीबद्दलचा आदर व्यक्त केला आहे. शिवसंस्कृतीचे गुणगान केले आहे. शिवकुळाचे मूळ महामानव श्री शंकर व श्रीमाय पार्वती यांना नम्र वंदन करून शंभू महाराज गणव्यवस्थेतील गणनायकांनाही अभिवादन करतात. मातृप्रधान गणनायिकांची गणराणी महामाया श्री भवानीदेवी समोर नतमस्तक होऊन शंभूराजे स्त्रीत्वाचा आत्यंतिक आदर करतात. भगवान श्रीकृष्ण व भगवान गौतम बुध्द श्रमकऱ्यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान आपणास ज्ञात झाल्याबद्दल या महामानवांप्रतीही कृतज्ञता व्यक्त करुन त्यांनाही वंदन करतात. पूर्वजांप्रती कृतज्ञता व्यक्त करतांना श्री शंभूराजे पूर्वजांचा नामोल्लेख करुन त्यांनी केलेल्या महान कार्याचा विशेष गौरव करतात. जनसामान्य रयतेच्या भावनांचाही आदर करुन श्री शंभूराजे राजधानी किल्ले रायगड व सर्व चराचर सृष्टीलाही वंदन करतात. शंभूराजे स्वतःचे वर्णन शंभूवर्मन असे करतात.

भवानीमातेसमोर विद्यासंपन्न श्री शंभूराजे नतमस्तक होऊन आपले मन उघडे करतात. बुधभूषण या महान ग्रंथाचे प्रयोजन सांगतात. वाचकांसाठी काही सूचना करतात. वाचकांनाही प्रवृत्त करतात. हा ग्रंथ मनोभावे वाचणारा वाचक 'पवन' म्हणजे वाऱ्यासारखा उपयुक्त व हलका होईल याची महाराज ग्वाही देतात. दूर समुद्रात पाण्याचे ढग जमलेले असतात. हे पाण्याने भरलेले ढग आपल्या कलेने वारा धरतीकडे म्हणजे शेतीकडे घेऊन येतो. त्यामुळे शेतीत पाऊस पडतो. जमिनीवर पाऊस पडतो. शेतकरी, रयत सुखात नांदते. तेव्हा हे वाचका तू या लोकोपयोगी वाऱ्यासारखा होऊन सर्व दूरपर्यंत पसरलेल्या खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचा वर्षाव होईल अशी कृती कर. तुझ्या या परोपकारी प्रवृत्तीचे तुझ्याच बुध्दीला भूषण वाटले पाहिजे. (अध्याय १ श्लोक २८)

बुधभूषणच्या केवळ वाचनाने वाचकांना कोणती प्रेरणा मिळावी हे वयाच्या चौदाव्या वर्षी शब्दबध्द करणारे राजपुत्र होते. त्यांच्या मनात शेतकरी, श्रमकरी, कष्टकरी रयतेबद्दल केवढी आपुलकी असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. श्रीकृष्ण व गौतम बुध्द यांच्या कल्पनेतील श्रमण संस्कृतीचा आदर केला. शेतकऱ्यांना केवळ सवलतीच दिल्या नाही तर त्यांना प्रचंड प्रोत्साहन दिले. शंभूराजांनी राजनीती केवळ सांगितली नाही तर स्वतः आचरणात आणली. राजाने सर्व दोष टाळलेच पाहिजे. हे सांगताना शंभूराजेंनी सात दोष हे राजाचे सर्वात मोठे शत्रू असल्याचे अध्याय दोन, श्लोक ४२२ मध्ये मांडले. वाचकांसाठी ते मुद्दाम देत आहे.

**ते सात दोष असे :**

१) कुणालाही फार टोचून बोलू नये.

२) कोणाशीही कठोर बोलू नये.

३) संरक्षणाशिवाय राजाने राज्यापासून दूर जाऊ नये.

४) राजाने मादक द्रव्य, दारू -अफू, गांजा असे पदार्थ सेवन करु नयेत.

५) राजाने जनानखाना बाळगू नये. परस्त्रीचा मातेसमान सन्मान करावा.

६) राजाने गरीब, जंगली वा पाळीव प्राण्यांची हत्या करुच नये.

७) राजाने द्युत- जुगारापासून दूर राहावे.

शंभूराजांचे निष्कलंक व्यक्तिमत्त्व समजण्यासाठी त्यांनीच राजाबद्दल लिहिलेला हा श्लोक मार्गदर्शक ठरावा. बुधभूषणमधून शंभूराजांनी पानापानावर असेच अनमोल विचार मांडलेत व आचरणात आणलेत.

शंभूराजेंनी रचलेला बुधभूषण हा संस्कृत ग्रंथ दुर्लक्षित राहिला असला तरी त्यांच्या राजकारभाराबाबत परदेशी लेखकांनी सविस्तर लिहिलेले आहे. बुधभूषणमधील दुसरा एकूण ६३२ श्लोकांचा अध्याय हा राजकारणावर आधारित आहे. यातील विचार सर्व जगासाठी व सर्व काळासाठी उपयुक्त आहेत. त्यात राजा, राजदरबार, प्रधान, राजपुत्र, राजकन्या, मंत्री, राष्ट्र, राजकर्तव्य, दुर्ग-किल्ले, साधनसामग्री, सैन्य व विविध सैन्य दले, हेरगिरी, लढाई, रयत अशा इत्यंभूत बाबींवर आदर्श भाष्य आहे. हे श्लोक रचताना शंभूराजांना ब्राह्मणी अवघड पंडिती संस्कृत शब्दभाषा न वापरता, बरीचशी बाळबोध संस्कृत भाषा वापरली आहे. याचा उल्लेख 'मराठा संस्कृत' असा केला आहे. शभूराजांची संस्कृत किती उच्च दर्जाची होती हे सांगण्यासाठी त्या काळातील जगश्रेष्ठ ब्राह्मण पंडित काशीचे गागाभट्टांनी अस्सल संस्कृत भाषेत 'समयनय' नावाचा संस्कृत ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात शंभूराजांचे वर्णन करताना संस्कृतभाषा ही फिकी पडते असे नम्रपणे नमूद करून, गागाभट्टांनी शंभूराजांचे गुणवर्णनपर काव्य रचले आहे. हा संस्कृतमधील गागाभट्टांचा 'समयनय' ग्रंथ त्यांनी नम्र भावाने शंभूराजांना अर्पण केला आहे. त्यावेळी शंभूराजांचे वय होते केवळ १८ वर्षे. शिवराजाभिषेकावेळी राजपुत्र शंभूराजे आणि गागाभट्ट यांच्यामध्ये विविध विषयांवर चर्चा होत. या चर्चेतून त्यांच्या बुषध्दिमत्तेचे श्रेष्ठत्व निर्विवाद मान्य केले. तरुण वयात असलेल्या सर्वविद्यासंपन्न, सर्वभाषापंडित शंभूराजांना त्यांनी गुरुस्थानी मानले.

शंभूराजांचे प्रेरणास्थान जसे शिवशंकर-पार्वती तसेच श्रीकृष्ण व गौतम बुध्दही होते. त्यांच्या लिखाणावर श्रीकृष्ण व गौतम बुध्दांच्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. श्रीकृष्णाने स्वकुळातील यादवांना संरक्षण देऊन त्यांच्यात स्वातंत्र्याची अस्मिता निर्माण केली. ही तरुण शेतकऱ्यांची पोर इंद्राविरुध्द उभी राहिली. इंद्राला कर देण्याचे नाकारुन त्यांनी इंद्राचा अधिकार नाकारला. त्यानंतर इंद्रावर आक्रमक करुन इंद्रास सीमेपलीकडे हाकलून लावले. भगवान गौतम बुध्द स्वतः राजपुत्र असूनही शाक्य विरुध्द कोलीय या आपसी नातेवाईक असलेल्या गणामधील संघर्ष टाळण्यासाठी सर्वसंग परित्याग करुन आयुष्यभर समाजास शिक्षित करत फिरले. भगवान गौतम बुध्दाचा प्रभाव असल्यामुळेच त्यांनी आपल्या प्रथम ग्रंथास बुधभूषण हे नाव दिले, हे स्पष्ट होते. याशिवाय शंभूराजांच्या आयुष्यातील अनेक घटना या भगवान गौतम बुध्दांच्या आयुष्याशी जुळताना आढळतात. उदा. दोघेही राजपुत्र. दोघेही अत्यंत बुध्दिमान, दोघेही दयावान, दोघांचेही वडील स्वतंत्र राजे. दोघांच्याही मातांचे बालपणीच निधन झाले. दोघांनाही वडिलांनी सर्वश्रेष्ठ शिक्षण दिले. दोघांनाही तरुण वयातच स्वतंत्र राज्यकारभार सांभाळवा लागला. दोघांनाही मंत्र्यांच्या वादास तोंड द्यावे लागले. दोघांच्याही पत्नीच्या नावात साधर्म्य. गौतम बुध्दांच्या यशोधरा तर शंभूराजांच्या येसूबाई. दोघांनीही अत्यंत सामर्थ्याने परिस्थितीवर विजय मिळवला. गणसमूहांमध्ये एकता टिकावी यासाठी सिध्दार्थास गृहत्याग करावा लागला तर स्वराज्य टिकावे यासाठी वयाच्या नवव्या वर्षी शंभूराजांना मोगलांकडे ओलीस राहावे लागले. दोघांनीही आपल्या ज्ञानाचा उपयोग जनसामान्यांना व्हावा यासाठी उद्बोधक लिखाण केले. दोघांनीही भगव्या रंगाचा स्वीकार केला. दोघेही जिवंतपणीच आपापल्या क्षेत्रात सर्वश्रेष्ठ ठरले. जनमान्य ठरले.

बुधभूषण या संस्कृत ग्रंथाव्यतिरिक्त नायिकाभेद, सात सतक, नखशिखा या ब्रीज/हिंदी भाषेतील ग्रंथातून संगीत, नृत्यप्रकार, ताल, लय, सूर याची विस्तृत माहिती नायिकाभेदमध्ये दिली आहे. नखशिखात नायिकेच्या नखापासून शिरापर्यंत वर्णन काव्यात्मक पध्दतीने केल्याचे सांगतात. सर्वगुणसंपन्न राजपुत्राला जर पूर्ण आयुष्य लाभले असते तर स्वराज्याचा इतिहास भूगोल वेगळा दिसला असता.

आजच्या दिवशीच स्वराज्याचा तेजस्वी दुसरा छत्रपती या पृथ्वीतलावर जन्मला होता. तमाम शिवशंभूप्रेमींना जन्मोत्सवाच्या खूप खूप शुभेच्छा...!

**तस्यात्मजः शंभुरित प्रसिध्दः समस्तसामन्त शिरोवतंसः।**

काव्यसाहित्यः पुरागगीतकोदण्डविद्यार्णव पारगामी बुधभूषण (अध्याय पहिला श्लोक ३०५)

थोर शिवप्रभूंच्या समस्त मांडलिकांमध्ये शिरोभूषण म्हणून शोभणारा आत्मज शंभू (राजा) म्हणून प्रसिध्दीस आला. तो काव्य, साहित्य, संगीत, धनुर्विद्या इ.चा कलासागर पार केलेला होता.



**राम गायकवाड,**
**मराठा सेवा संघ**
**सोलापूर**




दै. 'सायं अपडेट'च्या ३ ऱ्या वर्धापन दिनास तसेच
'सायं अपडेट न्यूज चॅनल'च्या शुभारंभास
हार्दिक शुभेच्छा
मा. दिलीप (भाऊ) कोल्हे
मा. सौ. मंगलाताई कोल्हे
कार्यरत उद्योग
गायत्री एन्टरप्रायजेस
घरगुती चाळणी, पोळपाट, बेलणे, विळी, कटर
तेजलक्ष्मी अगरबत्ती उद्योग
अगरबत्ती, धूपबत्ती, कापूर उत्पादन
TSVVSP Solapur Multi Product Cluster (KVIC, MUMBAI)
■ माढेश्वरी महिला बचत गट
■ स्वामी समर्थ नागरी पतसंस्था ■ सह्याद्री प्रोडक्टस्
■ तेजलक्ष्मी उद्योग समूह (कुलर उत्पादन)
■ सरस्वती महिला बचत गट (कडक भाकरी उत्पादन)
■ तेजस्विनी महिला उद्योग (इमिटेशन ज्वेलरी व राखी उद्योग)
■ सोलापूर मल्टि प्रोडक्ट क्लस्टर
"लक्ष्मी पापड
HIRASKAR-9922924638
तेजस्विनी
महिला उद्योग समूह
१३३/१३,
जुनी लक्ष्मी विष्णू चाळ,
डोणगांव रोड, सोलापूर.
सचिन चटके
9860043895
मंगेश डोंगरे
8805599500
संत तुकाराम म
संत ज्ञानेश्वर महाराज

# साहित्यवीर छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांनी भोसले कुळाचा अर्थातच शिव कुळाचा वारसा तलवारीबरोबर लेखणी ही तलवारी सारखी चालवूनही जोपासला. व ते छात्रवीर पदाबरोबर ज्ञानवीर या पदास पात्र ठरले. संभाजी महाराजांनी 'बुधभूषण', नखशिखा, नायिकाभेद व सातसतक हे ग्रंथ अवघ्या १४ व्या वर्षी लिहिले. नखशिखा हा ग्रंथ संभाजी महाराजांनी ब्रज भाषेमध्ये लिहिला. लहानपणीच कवी कलश, कवी भूषण यांच्यासारख्या विद्वानांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांना ब्रज भाषेतील ज्ञान व प्रेरणा मिळाली. श्रृंगारपुराच्या निसर्गरम्य वातावरणात हा ग्रंथ संभाजी राजांनी लिहिला. नखशिखा हे शृंगार प्रधान काव्य आहे. एखाद्या रुपगर्विनीचे नखापासून ते शीख म्हणजे शिरापर्यंत व डोक्यावरील लांब सडक केसापर्यंतचे शृंगारिक वर्णन नायक व नायिका यांच्यामधील हे समाजरूप काव्य आहे. त्यामध्ये रूपक अलंकाराचा पुरेपूर वापर केलेला आहे. आपण एखादे हुबेहूब वर्णन सांगतो तेव्हा नखशीखा हा प्रयोग करत असतो.

छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यात सातसतक या ग्रंथाचा समावेश आहे. सात म्हणजे अत्यानंद, सतक म्हणजे शंभर म्हणजेच अत्यानंद देणारी शंभर पदे छत्रपती संभाजी महाराजांनी रचलेली होती. त्याकाळी समाजामध्ये लिहिल्या जाणाऱ्या विविध अंगी साहित्य प्रकारांना छत्रपती संभाजी महाराजांनी स्पर्श केल्याचे दिसते. लोकसाहित्यातून लोकांना मानसिक समाधान व आनंद मिळावा अशी शंभूराजांची भावना होती.

संभाजी राजांचा नायिकाभेद हा ग्रंथ शृंगाररसप्रधान ब्रज भाषेत रचलेला असून भारतीय समाजावर आजही अधिराज्य गाजवणाऱ्या राधा-कृष्ण या प्रेमाजीवांच्या विविध भावमुद्रेवर आधारित आहे.

संभाजी महाराजांनी गवळण हा प्रकार आपल्या ग्रंथ संपदेतून राष्ट्रीय पातळीवर मांडलेला आहे गवळण हा प्रकार कशा प्रमाणे असला पाहिजे व त्याची ध्येयधोरण संभाजी महाराजांनी सांगितलेली आहेत. जल व्यवस्थापनापासून ते आपत्तीकाल व्यवस्थापनापर्यंत त्यांनी विचार मांडलेले आहेत. वेतनश्रेणीबद्दल सुध्दा त्यांनी भाष्य केलेले आहे व कलाकारांस, साहित्यिकांस दरमहा वेतन सुरू केले. म्हणजे आपण जे कलाकारांना व साहित्यिकांस जे सानुग्रह अनुदान वेतन देतो ते अत्यल्प असे आहे, त्यावेळेला संभाजी महाराजांनी दिलेले वेतन आजच्या प्रचलित चलना नुसार ९० हजार रुपये इतके होते. या सर्व गोष्टी त्यांनी त्यावेळी दिलेल्या आहेत. सर्व सूक्ष्म निरीक्षणे त्यांनी आपल्या लिखाणातून मांडलेली आहेत. चौदाव्या वर्षी इतकी विलक्षण दूरदृष्टी संभाजी महाराजांना लाभली आहे. 'बुधभूषण'मध्ये त्यांनी एक उदाहरण दिलेले आहे की, बाभळीच्या झाडाचे वर्णन त्यांनी केलेले आहे. ते म्हणतात, हे बाभळी तू निराश होऊ नकोस तुला असे वाटत असेल की तुझ्या सावलीला कोणी बसत नाही, तुला फुले येत नाहीत, फळे येत नाहीत, तुझा काही उपयोगच नाही, असे तुला जर वाटत असेल तर तुझा हा गैरसमज आहे. या जगामध्ये सर्व चैतन्य तुझ्यामुळेच तर आहे. जगामध्ये जी काही पाने आहेत, फुले आहेत, फळ आहेत ती तुझ्यामुळेच आहेत. कारण की लहानपणी त्या फळा व फुलांचे संरक्षण तुझ्याच फांद्या तर काटेरी कुंपण होऊन संरक्षण करतात. निसर्गात फुल, फळ व बहारदार वृक्ष आपण पाहतो, त्यांचे गुणवर्णन करतो. पण बाभळीसारख्या वृक्षाचे वर्णन संभाजी महाराज करतात. बाभळीसारखा वृक्ष आपण निरुपयोगी आहे असे म्हणतो, पण संभाजी महाराजांचा प्रत्येक वृक्षाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन किती चांगला आहे, या उदाहरणातून कळते. त्यांनी अशा बऱ्याच वृक्षांबद्दल भाष्य केलेले आहे. शाल्मली म्हणजेच काटेसावर या वृक्षाबद्दल सुध्दा संभाजी महाराजांनी भाष्य केलेले आहे. अशी बरीच अप्रतिम उदाहरणे संभाजी महाराजांनी 'बुधभूषण'मध्ये मांडलेली आहेत. आता संपत्तीबद्दल त्यांनी लिहिलेले आहे की, आपल्या जीवनामध्ये समाधान व संतोष मिळवायचा असेल तर आपल्या उत्पन्नातील किंवा मिळकतीतील एकचतुर्थांश धन आहे ते आपण साठवून ठेवले पाहिजे. म्हणजेच त्याचा संचय केला पाहिजे, तरच भविष्यामध्ये किंवा आयुष्यामध्ये पैशाचा तुटवडा तुम्हाला जाणवणार नाही, हे त्यांनी सांगितलेले आहे.



पाण्याबद्दल व धनाबद्दल त्यांनी सांगितलेले आहे की, जे शासक किंवा राज्य करणारे राज्यकर्ते आहेत त्यांनी सरकारातील तिजोरीमधील पैसा हा जपून वापरला पाहिजे व भविष्यामध्ये तशी चांगली तरतूद केली पाहिजे, नाहीतर राज्य लयाला जायला वेळ लागणार नाही व राज्य कर्जबाजारी सुध्दा होऊ शकते. ज्या वेळेला आपण या उपाययोजना करत असतो किंवा राज्यामध्ये आपत्ती किंवा पूर परिस्थिती निर्माण होते त्यावेळेला आपण लहान बालक, स्त्रिया व वृध्द यांची पहिला काळजी घेतली पाहिजे. हे धोरण सुध्दा संभाजी महाराजांनी मांडलेले आहे. या गोष्टीवर कोणीही आजपर्यंत भाष्य केलेले नाही. संभाजी महाराजांनी धर्माबद्दल असेही लिहून ठेवले आहे की, धर्म असावा समानता देणारा आणि धर्म असावा साऱ्या विश्वाला सामावून घेणारा अशी धर्माची व्याख्या संभाजी महाराजांनी मांडलेली आहे. समानतेचा धर्म मी मानतो व मी तो कृतीतून आचरणात आणलेला आहे, असे संभाजी महाराज म्हणतात व हा विश्वव्यापक समानतेचा धर्म माझ्या वडिलांनी म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापलेला आहे, असे वर्णन 'बुधभूषण' ग्रंथामध्ये आहे.

शिवाजी महाराजांनी जुन्या चालीरुढी, अनिष्ट परंपरा व सर्व जातीतील विषमता या सर्व गोष्टी काढून टाकून धर्मशुध्दी सुध्दा केलेली आहे व तोच धर्म मानवता शिकवतो, समानता शिकवतो बंधुत्व शिकवतो, न्याय शिकवतो अशाप्रकारे त्यांनी विवेचन 'बुधभूषण'मध्ये केलेले आहे. समानतेची गोष्ट त्याकाळी त्यांनी चौदाव्या वर्षी केलेली आहे आणि म्हणून न्यायप्रिय, समता प्रिय, संभाजी राजे होते. एकंदरीत त्यांच्या भाषाशैलीचे प्रभुत्व आपण जर पाहिले तर संत कबीर, तुकोबाराय यांच्या विचारांची जी प्रभावळ होती. त्या प्रभावळीमधले उच्च कोटीचे संभाजी महाराज हे विचारवंत होते. दुसरा एक संदर्भ आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक वेळी गागाभट्ट जेव्हा रायगडला आले होते त्यावेळी गागाभट्टांनी संभाजी महाराजांबरोबर संवाद साधलेला आहे. त्यावेळी गागाभट्ट यांनी 'समयनय' नावाचा ग्रंथ लिहिला व त्या ग्रंथाची अर्पण पत्रिका संभाजी राजांना दिली. आता हा संदर्भ यासाठी महत्त्वाचा आहे. भाषेमधील विद्वान पंडित गागाभट्ट तत्कालीन भारतामधील उच्च कोटीचे भाषा पंडित म्हणून गागाभट्टांची ख्याती होती. यावरून इतके दिसून येते की साहित्यातील भाषा पंडित गागाभट्ट यांनी संभाजी महाराजांची भाषेतील विद्वत्ता मान्य करून त्यांनी 'समयनय' या ग्रंथाची अर्पण पत्रिका संभाजी महाराजांना अर्पण करून त्यांचे साहित्य व भाषेचे प्रभुत्व मान्य केले आहे.

पहिल्या चिलखताचे (बुलेटप्रूफ जॅकेट) निर्माते संभाजी महाराज आहेत. पाण्यावर तरंगणारा तोफखाना संभाजी महाराजांनी तयार केलेला आहे व आरमाराचे जे स्वराज्यामध्ये चार ठिकाणी कारखाने होते. तिथे सुध्दा तांत्रिक सुधारणा संभाजी महाराजांनी केलेल्या आहेत. शिवाजी महाराजांना 'फादर ऑफ नेव्ही' असे संबोधले जाते. राजापुरापासून ते मुंबईपर्यंत जे आरमार होते, तेथील कारागीर जे होते ते आगरी कोळी, भंडारी समाज्याचे होते. त्यांना प्रशिक्षित करून त्यांच्याकडून उत्कृष्ट अशी कामे करून घेतलेली आहेत. त्यावेळेला त्यांच्याकडून तरंगता तोफखाना किमान पाच टन वजनाचा त्यांनी बनवून घेतलेला आहे आणि ती सुध्दा इतिहासातील एकमेव पहिली घटना आहे. शिवाजी महाराजांनी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरवण्याचे काम संभाजी महाराजांनी केलेले आहे. आपली पत्नी येसूबाईंना शिक्के कट्यारीचा मान संभाजी महाराजांनी दिलेला आहे तसेच आपल्या राजमुद्रेमध्ये येसूबाई यांच्या प्रतिमेला स्थान संभाजी महाराजांनी दिलेले आहे व चलनी नाण्यावर येसूबाई यांच्या रेखाचित्राला स्थान दिले होते. हे जगातील पहिले चलन आहे की एका महिलेला इतक्या उच्चकोटीचे स्थान एका चलनावर दिलेले आहे. तसेच येसूबाई या दुसऱ्या कुलमुखत्यार आहेत पहिल्या राजमाता जिजाऊ व दुसऱ्या येसूबाई आहेत. कुलमुखत्यार म्हटले तर दुसऱ्या राष्ट्रपतीच आहेत. छत्रपतींच्या अप्रोक्ष राजकारभार चालवण्याची मुभा कायदेशीररीत्या जिजाऊंना होती. त्यानंतर ती येसूबाईंना मिळाली. आज आपण ३६ टक्के ५० टक्के आरक्षणाच्या गोष्टी करतो. तेव्हा त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी व संभाजी महाराजांनी प्रत्यक्षरीत्या त्या योजना अमलात आणल्या होत्या. त्या नंतरच्या काळात आम्ही त्या चालवल्या नाहीत, इतके आम्ही नतद्रस्ट आहोत. म्हणजे त्या चांगल्या रूढी परंपरा आणि ते त्यांचे आचरण आज आपण आचरणात आणलो असतो तर पुरुष व महिलांची विषमतेची दरी आज झाली नसती. तर अशा बऱ्याच घटना आहेत. संभाजी महाराजांचे जे तत्त्वज्ञान आहे ते मानवी संसाधन खात्याशी निगडित आहे व या खात्याचे जनक संभाजी महाराज आहेत व हे सर्व 'बुधभूषण' वाचल्यानंतरच कळेल.

'बुधभूषण'मध्ये विवेचन करतेवेळी संभाजी महाराजांनी असे म्हटले आहे की, बोलताना माणसाची न्यहाळावी देहबोली, लगेचच समजते अंतरीची खोली. समोरचा माणूस बोलतोय ते आपण नीट निरीक्षण करून बघितले पाहिजे. त्याच्या देहबोलीवरून लगेच कळते की त्याची भावमुद्रा काय आहे किंवा त्याचा मनसुबा काय आहे, त्याचे डोळे काय बोलतात, त्याच्या आवाजाची कंपन काय म्हणते मग त्याच्यामध्ये सत्यता आहे काय? तो व्यक्ती खोटे बोलतो आहे काय? हे लगेच समजून येते असे अनेक सारे दाखले आहेत. मानवी संसाधनावर तसेच व्यवस्थापन शास्त्रावर सुध्दा त्यांनी भाष्य केले आहे. कारण संभाजी महाराज उत्तम मॅनेजमेंट गुरु होते.

संभाजी महाराज प्रचंड शक्तिशाली होते तसेच प्रचंड बुध्दिमानही होते आणि त्यांनी आपल्या ग्रंथसंपदेमध्ये लिहून ठेवलेले आहे की त्यांना उत्तमरीत्या संगीत येत होते. ज्या अष्टप्रधान कला आहेत त्या सर्व मला अवगत आहेत. संगीत असेल, भाषाशास्त्र असेल, धनुर्विद्या असेल, शस्त्रविद्या असेल हे सर्व मला अवगत आहे व मी ती परिपूर्णपणे शिकलेली आहे. असे स्वतः त्यांनी लिहून ठेवलेले आहे.

संभाजी महाराज तंजावरला (तमिळनाडू) गेले असताना शिवाजी महाराजांच्या सावत्र आई तुळजाई (शहाजीराजांची दुसरी पत्नी)यांच्याकडे होते. त्यावेळी संभाजी महाराजांना आमटी बनवायची होती. त्यामध्ये तिकडे साधारणतः भाजीमध्ये अमसूल वापरतात. पण त्या वेळेला तेथे अमसूल उपलब्ध नसल्यामुळे संभाजी महाराजांनी चिंच वापरली व तेथे एक वेगळी भाजी तयार झाली. त्या भाजीचे नाव सांभार असे पडले. 'सांभार जे आहे ते म्हणजे संभाजीचा आहार म्हणजेच सांभार' हे दक्षिणेतील लोकांना सुध्दा फारसे माहीत नाही आहे.

संभाजी महाराजांचे तत्त्वज्ञान हे कालबाह्य न होण्यासारखे आहे. माणूस जिवंत आहे तोपर्यंत संभाजी राजांचे तत्त्वज्ञान आहे. माणसे आपली कशी ओळखावी तर संकट आल्यावर मित्र समजेल, वैभव नष्ट झाल्यावर बायको समजेल. खरी माणसे तेव्हाच समजतात जेव्हा संकट येतात. अशा बऱ्याच व्याख्या त्यांनी सांगितलेल्या आहेत. त्यांनी समाज व्यवस्थेबद्दल, राज्य व्यवस्थेबद्दल अशी अनेक काव्ये रचली आहेत. भाषाशास्त्राबद्दल आहेत, वनस्पतिशास्त्राबद्दल आहेत, कृषीशास्त्राबद्दल आहेत. चांगल्या व वाईट माणसाची व्याख्या सुध्दा त्यांनी मांडलेली आहे. माणसाचा विचार किती विषारी असतो यावर त्यांनी भाष्य करतेवेळी म्हटले आहे की, हे नागराजा तू जास्त चमकू नकोस. दुर्जनांची चमक तुझ्याहून अधिक आहे. तुझ्या तर फक्त जीभेत विष आहे, त्यांच्या साऱ्या शरीरात विष आहे. दुर्जन माणूस हा अस्सल नागापेक्षा विषारी असू शकतो आणि समाजाचा तो नाश करू शकतो. अंधश्रध्देबद्दल भाष्य करतेवेळी सुध्दा त्यांचे एक कवन प्रसिध्द आहे.

**हे स्वर्णमयी कळसा तुझा रंग जाईल**
**मूळ तांब्याचा रंग पुन्हा आवरणी येईल**
**बाह्य रंग जनास भूल पाडे**
**ते कुठे जाणे तुझे अंतरंग बापुडे**

लोक इतकी मूर्ख आहेत की लोकांना वाटते की तो सोन्याचा कळस आहे कारण मुळातच तो तांब्याचा आहे व त्याला सोन्याचा मुलामा दिलेला आहे असे त्यांनी अंधश्रध्देवर कवन केले आहे.

संभाजी राजांनी धुळीबद्दल सुध्दा काव्य केलेले आहे. धूळ आणि वादळाशी संवाद करताना ते म्हणतात, हे वादळा तू धुळीला कशासाठी प्रतिष्ठा मिळवून देतोस. ही धूळ आमच्या डोळ्यात जाते आणि ती प्रतिष्ठा त्या धुळीला मिळवून देऊ नकोस, असे संभाजी महाराज म्हणतात. इतक्या उच्च कोटीचे संवाद 'बुधभूषण'मध्ये आहेत. कुंभारावर सुध्दा त्यांनी भाष्य केलेले आहे. मडके बनवताना जो मातीचा प्रवास आहे त्या प्रवासाबद्दल त्यांनी फार चांगले बोललेले आहे. माती ही आई आहे व ती सजीव सृष्टी देते. या मातीचा कुंभाराकडून कसा नकळत अपमान होतो तर तो तिला गाढवावर टाकतो. तिला तो त्यानंतर चक्रावर फिरवतो. त्यानंतर गरम भात्यात टाकतो. किती वेदना होत असतील त्या मातीला. म्हणजेच आईला ज्याप्रमाणे वेदना होतात त्याप्रमाणे त्यांनी मातीचे वर्णन केले आहे. इतके सूक्ष्म निरीक्षण 'बुधभूषण'मध्ये केलेले आहे. संभाजी महाराजांच्या जाणिवा फार जिवंत होत्या आणि फारच प्रगल्भ होत्या. वयाच्या चौदाव्या वर्षी इतक्या प्रगल्भ जाणिवा असणारा एकमेव राजा म्हणजे संभाजी महाराज. छत्रपती शिवाजी महाराजांचे व जिजाऊंचे किती मौलिक संस्कार संभाजी महाराजांवर झालेले आहेत ते यावरून स्पष्ट दिसून येते.

बत्तीस वर्षांच्या आयुष्यामध्ये नऊ वर्ष त्यांनी राज्य कारभार केलेला आहे. 'बुधभूषण' हा शब्द १६७२ मध्ये संभाजी महाराजांनी वापरला. त्यानंतर 'बुधभूषण' हा शब्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या प्रिंटिंग प्रेससाठी वापरलेला आहे. यातून स्पष्ट होते की, 'बुधभूषण' या ग्रंथापर्यंत बाबासाहेब पोहोचलेले होते. कारण शिवचरित्र व शंभू चरित्राचे बाबासाहेब चांगले अभ्यासक होते.

असेच बाबासाहेबांप्रमाणे छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरित्राचे अभ्यासक आपण सर्वजण होऊया. त्यांच्या चरित्रातून ज्ञानाची प्रेरणा घेऊया व बदलत्या काळात त्यांच्या ग्रंथसंपदेचा, ज्ञानाचा आदर्श घेऊन शिक्षण, कला, क्रीडा, संगणक व साहित्य क्षेत्रात आपण सर्वांनी उत्तुंग गरुडभरारी घेऊन, नवनवीन क्षेत्रे पदाक्रांत करूया.

**आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीदिनी सर्वांना शिवमय शुभेच्छा!**

(या लेखाचे लेखक यांनी छत्रपती संभाजी महाराज यांनी संस्कृत भाषेत लिहलेल्या 'बुधभूषण' या ग्रंथाचा मराठी काव्य अनुवाद केला आहे).


**डॉ. शरद गोरे**
सुप्रसिध्द इतिहास संशोधक, पुणे
९४२२३००३६२





दैनिक सायं अपडेट
दै. सायं अपडेट च्या
वर्धापनदिनास तसेच
सायं अपडेट
न्यूज चॅनल च्या शुभारंभास
हार्दिक शुभेच्छा!
मा. कुमार दादा करजगी
शुभेच्छुक
• नागेश करजगी ऑर्चिड स्कूल
• यश कन्स्ट्रक्शन
• यशराज वायनरीज
• मोहिनी वॉटर पार्क
• उमा सहकारी पतसंस्था
संस्थापक- कुमारदादा करजगी,
सोलापूर
मा. यशराज नागेश करजगी






# छत्रपती संभाजी महाराज- एक कुशल प्रशासक

छत्रपती संभाजी महाराजांची राजकीय कारकीर्द अवघी नऊ वर्षांची राहिली. या कारकिर्दीमध्ये मोगल, सिद्दी, पोर्तुगीज यांच्याशी त्यांचा अविरत रणसंग्राम चालू होता. इतकेच नाही तर राजघराण्यातील व राजदरबारातील मातब्बर व्यक्तींचा विरोध, त्यांनी केलेली कटकारस्थाने यामुळे संभाजी महाराजांच्या कारकिर्दीची सुरुवात अत्यंत अस्थिर अशा पध्दतीची राहिली. तरी देखील संभाजी महाराजांनी स्वराज्याचा राज्यकारभार अत्यंत कुशलपणे चालविलेला आपणास दिसून येतो. वडिलांच्या वेळी जो शिरस्ता होता तोच कटाक्षाने पुढे चालविण्याचे कार्य छत्रपती संभाजी महाराजांनी केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या कालखंडात छत्रपती हे संपूर्ण प्रशासनाचे केंद्रबिंदू होते. कायदा, न्याय, मुलखी व लष्करी व्यवस्था या सर्वांच्या बाबतीत छत्रपती सर्वाधिकारी होते.

**छत्रपती संभाजी महाराजांची मुद्रा**

***।। श्री शंभो: शिवजातस्य मुद्रा द्यो, रिवराजते।***

***यदं, कसेविणी लेखा, वर्तते कस्य नो परी।।***

याचा अर्थ 'संभाजींची ही मुद्रा सूर्यप्रभेप्रमाणे शोभते व ज्या मुद्रेचा आश्रय करणारी लेखा सुध्दा कोणावरही सत्ता चालविते तीही शिवपुत्र शंभूची मुद्रा प्रकाशमान होत आहे', याला अनुसरुनच त्यांनी आपला कारभार चालविला.

संभाजी महाराजांनी आपल्या गैरहजेरीत राज्य शासन पाहण्याचा अधिकार महाराणी येसूबाईंना दिला होता. त्यांना 'श्री सखी राज्ञी जयती' असा शिक्का ही करून दिलेला होता. त्याचप्रमाणे सन १६८३ मध्ये कवी कलशास 'कुल ये ख्तीयार' देऊन मंत्रिमंडळात स्थान दिले होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळामध्ये असलेल्या सर्व प्रधानांना विविध प्रांतांचा कारभार हा त्यांनी सोपविलेला होता. त्याचप्रमाणे प्रत्येक प्रधानांकडे दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानिस, चिटणीस, जामदार, पोतनीस हे अधिकारी नेमून दिलेले होते. चिटणीस हे संभाजी महाराजांचे महत्त्वाचे अधिकारी होते. राजपत्रे लिहिणे, महत्त्वाच्या राजकीय पत्रांना उत्तरे देणे ही कामे ते करत असत. याशिवाय राज्यकारभाराकडे सूक्ष्मपणे लक्ष देण्याकरिता १८ कारखाने १२ महाल यामध्ये राज्यातील विविध लहान लहान विभागांची विभागणीही करण्यात आलेली होती.

छत्रपती संभाजी महाराजांनी युध्दाच्या धामधुमीतही थोरल्या महाराजांचे प्रजाहिताचे धोरण प्रत्यक्षात राबविले. कोसळलेल्या संकटात वतनदारांना दुखावणे परवडणारे नसतानाही त्यांनी रयतेस त्रास देणाऱ्या, बंडखोरी करणाऱ्या वतनदारांची गय केली नाही. सर्जेराव जेधेंचा भाऊ मोगलांकडे गेला होता, पुढे सुरक्षिततेसाठी सर्जेराव जेधेही मोघलांकडे गेले. परंतु पश्चात्ताप झाल्यानंतर सर्जेराव जेधे पुन्हा संभाजी महाराजांकडे आले. तेव्हा त्यांना अभय देताना कडक शब्दांमध्ये त्यांची कानउघाडणी करण्यास संभाजीराजांनी मागेपुढे पाहिले नाही. स्वराज्य कार्यात सहभागी देशमुखांना अधिकाऱ्याने त्रास देऊ नये अशी ताकीद आपल्या अधिकाऱ्यांना दिलेली होती. आणि जो कोणी अधिकारी आपला आदेश मानणार नाही त्यांना खरमरीत शब्दांत सुनावण्याचे काम त्यांनी केल्याचे



दिसून येते. कल्याण प्रांतातील गोपजी व सूर्याजी प्रभू यांचा वतन विषयक खटला शिवकाळापासून चालू होता. तो संभाजी महाराजांनी सन १६८८ मध्ये सोडविलेला आपल्याला दिसून येतो.

खुद्द मोगल बादशहा औरंगजेब दक्षिणेत प्रचंड मोठे सैन्य व साधनसामग्री घेऊन उतरला होता. रात्रंदिनी युध्दाचे प्रसंग चालू होते. या युध्दाच्या धामधुमीत देखील संभाजी महाराजांची न्यायव्यवस्था अत्यंत निर्भीडपणे व निर्भयपणे न्यायदान करत असताना आपल्याला दिसून येते. सन १६८५ साली रायगडावर एक चोरी प्रकरणाच्या न्याय निवाड्यासाठी आयोजित सभेत संभाजी राजे, पेशवे निळोपंत, सेनापती हंबीरराव, मुख्य न्यायाधीश प्रल्हाद निराजी, छंदोगामात्य कवी कलश हे उपस्थित असल्याचे आढळते. निष्पक्षपातीपणे, पुरावे साक्षीदार तपासून गुन्ह्याची चौकशी करूनच न्यायदान केले जात होते.

मोगलांनी केलेल्या आक्रमणामुळे लष्करी खर्चामध्ये प्रचंड वाढ झालेली होती. सन १६८५ ते ८७ या काळात अनेक ठिकाणी दुष्काळ पडलेला होता. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी संभाजी महाराजांनी पडीक जमीन लागवडीस प्रोत्साहन दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील करव्यवस्था त्यांनी पुढे चालवली. मोगली व आदिलशाही मुलखात बुऱ्हानपूर, धरणगाव, जालना, बिदर, मैसूर इत्यादी ठिकाणे लुटून त्यांनी पैसा उभा केला. चौथाई वसुलीसाठी स्वाऱ्या केल्या व आपली स्वराज्याची अर्थव्यवस्था मजबूत ठेवली.

छत्रपती संभाजी महाराजांनी एकाच वेळी मोगलांच्या खान्देश, कोकण, कर्नाटकच्या प्रदेशात स्वाऱ्या केल्या. शिवकाळापेक्षा दुप्पटीने लष्करी सामर्थ्य वाढविले. डिचोली, कुडाळ या ठिकाणी दारूगोळ्याचे कारखाने उभारले. सर्व किल्ल्यावर दारूगोळा, अन्नधान्यांचा मुबलक साठा केला. फोंड्याजवळ मर्दनगड बांधला. साष्टी प्रदेशात खोलगड नावाचा किल्ला बांधण्यास सुरुवात केली. आपत्काली किल्ल्यावर शिल्लक धान्यसाठ्याचा रयतेसाठी उपयोग केला. निळो मोरेश्वर आणि सागरगडाच्या कोठारातून पन्नास खंडित धान्य रयतेस लावणी व संचणी करण्यासाठी दिल्याची नोंद आहे.

छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात आरमारात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. राजापूरजवळ ६० गलबते व गुराब नेहमी सज्ज ठेवलेली असत. पेण येथे तसेच थल येथे आरमार सुसज्ज ठेवले. मुंबई खाडीत १०० गलबते तयार ठेवल्याची माहिती मिळते.

छत्रपती संभाजी महाराजांनी धार्मिक धोरणात ही आपल्या वडिलांचाच कित्ता पुढे चालविला. त्यांच्या लष्करात, आरमारात अनेक मुस्लीम अधिकारी होते. इतर धार्मिक श्रध्दास्थळांचा आदर करण्यास त्यांनी सैनिकांना सांगितले होते. बाटलेल्या हिंदूंचे शुध्दीकरण करून त्यांना स्वधर्मात घेतले. सन १६८४ साली इंग्रजांशी करार करून आपल्या राज्यातून गुलाम करण्यासाठी किंवा ख्रिश्चन बनविण्यासाठी माणसांना विकत घेता येणार नाही हे त्यांनी बजावले. बलाढ्य शत्रू सैन्याशी लढत असताना आपल्या राज्यातील प्रशासन अत्यंत मजबूत ठेवत त्या प्रशासनावर असणारी पकड त्यांनी जराही ढिली होऊ दिली नाही. हे पाहून छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाची, पराक्रमाची साक्ष आपणास पटते.

**प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण**






दैनिक
सायं अपडेट
३ रा वर्धापन दिन तसेच
अपडेट NEWS
(न्यूज चॅनल)
शुभारंभास हार्दिक शुभेच्छा !
श्री. सिद्धेश्वर काळे
श्री. संकेत काळे
Highways Construction
SHRI
SIDDHESHWAR
CONSTRUCTION
L & T Kemco Japan
Sand Plant
M Sand
P Sand
We Build Your Dream's..
S.P. Kale
Tulajapur Road, Gangewadi, Solapur/
9922298477, 8668843272, 8668568730
HIRASKAR-9922924638



# छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. ते छत्रपती शिवाजी महाराज आणि सईबाई यांचे ज्येष्ठ पुत्र होते. त्यावेळी शिवाजी महाराज आदिलशाही आणि मुघलांशी लढा देत होते. त्यामुळे संभाजी महाराजांचे बालपण अनेक राजकीय आणि सामाजिक उलथापालथीच्या काळात गेले. लहानपणापासूनच त्यांना रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू मिळाले.

**संभाजी महाराजांचे शिक्षण आणि प्रशिक्षण**

**भाषेचे शिक्षण**

* संस्कृत : या भाषेतून त्यांनी हिंदू धर्म, संस्कृती आणि नीतिशास्त्राचा अभ्यास केला.
* मराठी : मराठी भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे त्यांना राज्यकारभार आणि जनसामान्यांशी संवाद साधण्यास मदत झाली.
* हिंदी : हिंदी भाषेचे ज्ञान उत्तर भारतातील राजकीय परिस्थिती समजण्यासाठी उपयुक्त ठरले.
* इंग्रजी : इंग्रजी भाषेच्या शिक्षणामुळे त्यांना युरोपियन राजकारण आणि तंत्रज्ञानाची माहिती मिळाली.
* फारसी : मुघल साम्राज्याशी संवाद साधण्यासाठी फारसी भाषेचे ज्ञान आवश्यक होते.
* अरबी : अरबी भाषेचा अभ्यास त्यांना इस्लामिक संस्कृती आणि कायद्याची माहिती देण्यासाठी उपयुक्त ठरला.

**कौशल्य प्रशिक्षण**

* तलवारबाजी : युध्दकलेमध्ये निपुणता प्राप्त करण्यासाठी त्यांना तलवारबाजीचे प्रशिक्षण देण्यात आले.
* घोडेस्वारी : घोडेस्वारीवर प्रभुत्व असल्यामुळे त्यांना लष्करी मोहिमांमध्ये गतिशीलता मिळाली.
